# प्रेस नोट

## पोलीस स्टेशन यवतमाळ शहर जिल्हा यवतमाळ

**जुण्या वादाचे कारणावरुन जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न करणा-या आरोपीला एका तासात अटक**

पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे फिर्यादि नामे शेख अकबर शेख रोशन वय 70 वर्षे रा. कुंभारपुरा यवतमाळ यांनी जबानी रीपोर्ट दिला की, दिनांक 14/10/2025 रोजी 18/15 वाजताचे सुमारास त्यांचा मुलगा नामे शेख सज्जाद शेख अकबर वय 28 वर्षे यास त्याचेच घरासमोर राहणारा आरोपी नामे जावेद शाह यासीन शाह वय 40 वर्षे व त्याचा भाचा गुड्डु तात्या उर्फ मोहम्मद अहेफाज मोहम्मद जावेद वय 25 वर्षे दोघे हि रा. कुंभारपुरा यवतमाळ यांनी जुण्या वादाचे कारणावरुन कुंभारपुरा येथील कब्रस्थानच्या गेट समोर त्याचे सोबत जुन्या भांडणाच्या कारणावरुन जाणीवपुर्वक वाद करुन त्याला जिवाने मारण्याचे उद्देशाने जावेद शहा यासीन शहा यासीन याने लोखंडी पाईपने व मोहम्मद अहेफाज याने चाकुने पोटात व शरीरावर इतर ठिकाणी वार करुन जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न करुन त्याला गंभीर जखमी केले वरुन जखमी यास तेथील लोकांनी शासकीय रुगणालय यवतमाळ येथे उपचाराकरीता भरती करण्यात आले व जखमी याच्या वडिलांच्या फिर्याद वरुन पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे आरोपी नामे जावेद शाह यासीन शाह वय 40 वर्षे व त्याचा भाचा गुड्डु तात्या उर्फ मोहम्मद अहेफाज मोहम्मद जावेद वय 25 वर्षे दोघे हि रा. कुंभारपुरा यवतमाळ यांचे विरुध्द अप क्र. 894/2025 कलम 109,3(5) भा.न्या.संहिता कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेता पोलीस स्टेशन यवतमाळ शहरचे ठाणेदार मा. पोलिस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांनी पो.स्टे. च्या डि.बी. पथकास आरोपी शोधुन अटक करण्याच्या सुचना दिल्यावरुन पो.स्टे.चे डिबी पथक हे वेगवेगळया ठिकाणी आरोपीचा शोध घेत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, नमुद गुन्ह्यातील मुख्य आरोपी हा ग्राम सावरगड येथे दिसुन आले आहे. अश्या माहितीवरुन डि.बी. पथकातील स.पो.नि. मिलींद सरकटे, पो.उप-नि गणेश सपकाळ, पो.हवा रावसाहेब शेंडे, पो.हवा प्रदिप नाईकवाडे, पो.शि. गौरव ठाकरे, पो.शि. पवन नांदेकर,पो.शि. अभिषेक वानखडे यांनी तात्काळ ग्राम सावरगड येथे रवाना होवुन आरोपी हे सावरगड येथे गावात लपुन बसुन दिसल्यावरुन घेराव घालुन पकडुन त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव गुड्डु तात्या उर्फ मोहम्मद अहेफाज मोहम्मद जावेद वय 25 वर्षे असे सांगुन गुन्हा केल्याची कबुली दिल्यावरुन सदर आरोपी 1 तासाच्या आत ताब्यात घेवुन अटक करण्यात आला असुन पुढील तपास पो.उप.नि. भाट सा. करत आहे.

सदर ची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक कुमार चिंता साहेब, अपर पोलीस अधिक्षक अशोक थोरात सा,उपविभागीय पोलीस अधिकारी मा. दिनेश बैसाने सो, पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव सा. यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे प्रगटीकरण(डि.बी.) स.पो.मिलींद सरकटे, पो.उप.नि. गणेश सपकाळ, पो.हवा. रावसाहेब शेंडे, पो.हवा. प्रदिप नाईकवाडे, पो.शि. गौरव ठाकरे, पो.शि.पवन नांदेकर पो.शि.प्रदिप कुरडकर, पो.शि.अभिषेक वानखडे, यांनी केली.

**पोलीस निरीक्षक**
**पो.स्टे.यवतमाळ(श.)**